उल्हासनगर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १५/१२/२०२२

# प्रेसनोट

मराठीचे वैभव जपणे, तिचा प्रचार, प्रसार व संवर्धन करणे, वाचनाची आवड वृध्दींगत करणे यासाठी शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखाली शासकीय/निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, शासकीय संस्था मंडळे, सार्वजनिक उपक्रम, महाविद्यालये/शाळा इत्यादी कार्यालयांनी विविध उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत शासनस्तरावरून परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने दिनांक १४/१२/२०२२ रोजी सायंकाळी ४:३० वाजता उल्हासनगर महानगरपालिका महासभा सभागृहात श्री. जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त (शहर) यांचे "व्याख्यान" आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानामध्ये त्यांनी मराठीचे वैभव जपणे, तिचा प्रचार, प्रसार व संवर्धन करणे, वाचनाची आवड वृध्दींगत करणे याबाबत उपस्थितांना माहिती दिली. विशेष म्हणजे माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर जन्मदिवस हा "वाचना प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत त्यांनी चांगल्या प्रकारे समजावून सांगीतले. तसेच दिनांक १८ डिसेंबर, २०२२ हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून सादर करणेबाबत मार्गदर्शन केले.

भारत अभियान अंतर्गत शासनामार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ ची अंमलबजावणी सूरू असून, त्याअन्वये शहरामध्ये साफसफाई व स्वच्छता संबंधी विशेष कार्यवाही करण्यात येत असल्याचे श्री. अशोक जाधव, उप-आयुक्त (आरोग्य) यांनी सांगीतले. तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२३ उल्हासनगर शहरासाठी ब्रँड अम्बेसिटर म्हणून कु. अक्षता प्रमोद टाले, श्री. राजेंद्र आनंद देठे व सिमरन निता क्षत्री (किन्नर अस्मिता) यांची नेमणूक करण्यात आल्याचे सांगीतले. तसेच श्रीमती. प्राजक्ता कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी यांनी मराठी भाषा दिनाबाबत व अल्पसंख्याक योजनाबाबत मार्गदर्शन केले. श्रीमती श्रध्दा सपकाळे, सिस्टिम ॲनलिस्ट यांनी माय मराठी ॲप वापराबाबत उपस्थितांना महत्वाचे मार्गदर्शन केले.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेस नोट दि.१५/१२/२०२२ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.